# राष्ट्रीय बातमीपत्र - 1.30 PM

**दिनांक: 03.03.2021** **वार: बुधवार**

---

## ठळक बातम्या

1 आत्मनिर्भर भारतासाठी युवकांमधील आत्मविश्वास शिक्षण, संशोधन आणि कौशल्यामुळेच वाढीस लागेल असं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2 देशात चोवीस तासात बरे झालेल्या कोविड रुग्णांपेक्षा नव्या रुग्णांची संख्या अधिक
3 संयुक्त अरब अमिरातीच्या हवाई दलाद्वारे आयोजित युद्ध सरावात भारताचा प्रथमच सहभाग
4 टॉय फेअर 2021 च्या कालावधीत दोन दिवसांनी वाढ आणि
5 वने आणि उपजीविका: शाश्वत लोक आणि पृथ्वी या संकल्पनेसह आज जागतिक वन्य दिनाचं प्रयोजन

---

**शिक्षण वेबिनार**
शिक्षणाला रोजगार आणि उद्यमशीलतेशी जोडण्याच्या सरकारच्या प्रयत्नांच्या कक्षा यंदाच्या अर्थसंकल्पामुळे रुंदावल्या आहेत असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.
यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये आरोग्यापाठोपाठ सर्वात जास्त भर शिक्षण , संशोधन आणि कौशल्य विकासावरच देण्यात आला असल्याचं त्यांनी सांगितलं.
ते आज उच्च शिक्षण क्षेत्रासाठी अर्थसंकल्पीय तरतूद या विषयावरील वेबिनारमध्ये बोलत होते.
नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात स्थानिक भाषांच्या वापरावर भर दिला असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. जगातील सर्वोत्कृष्ट शैक्षणिक साहित्य भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करून देणे ही भाषा तज्ज्ञांची जबाबदारी आहे असे ते म्हणाले.
आपल्याकडील ज्ञान संशोधन मर्यादित राहणं हा देशाच्या सामर्थ्यावर मोठा अन्याय ठरतो असं पंतप्रधान म्हणाले.
आत्मनिर्भर भारतासाठी आहे देशातील युवकांमध्ये आत्मविश्वास गरजेचा आहे शिक्षण संशोधन आणि कौशल यामुळेच आत्मविश्वास वाढीस लागेल असे ते म्हणाले.एकविसाव्या शतकातील भारताला एकोणिसाव्या शतकातील विचारप्रणाली सोडून आता पुढे जावे लागेल असं मत त्यांनी व्यक्त केलं.
सागरी उद्योग क्षमता विकसित करण्याच्या उद्देशानं सरकार डीप सी मिशन सुरु करणार आहे.
भारतानं हायड्रोजन वर चालणाऱ्या वाहनांची चाचणी पूर्ण केली असून आता वाहन बाजारात हायड्रोजन चा वापर इंधन म्हणून करण्याच्या दृष्टीनं देशानं तयार व्हायला हवं. देशाला ऊर्जेबाबत

आत्मनिर्भर बनवण्याच्या दृष्टीनं फ्युचर फ्युएल आणि हरित उर्जा अत्यंत महत्वाची आहे म्हणूनच यंदाच्या अर्थसंकल्पात घोषित करण्यात आलेला हायड्रोजन मिशन हा प्रकल्प मोठं पाउल असल्याचं ते म्हणाले.
कोरोना विषाणू प्रतिबंधक लसीच्या निर्मितीमुळे भारताला जागतिक पातळीवर सुरक्षा आणि सन्मान मिळाला आहे असं पंतप्रधान म्हणाले.
विज्ञानाधारित प्रकाशनांबाबत भारत जगातील सर्वोत्कृष्ट तीन देशांमध्ये असल्याचं त्यांनी सांगितलं.
आपल्या देशात प्रतिभावान युवकांची काहीच कमतरता नाही, अनेक क्षेत्रांचे दरवाजे युवकांसाठी खुले होत असून विविध देशांमध्ये भारतीय प्रतिभेची मागणी वाढत असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

**देश कोविड**

देशात काल 14 हजार  8 शे 91 नवीन कोरोनाबाधित रुग्ण आढळले असून  अत्तापर्यंतच्या बधितांची संख्या  1कोटी 11लाख  39 हजार 5 शे 16 इतकी झाली आहे.  काल दिवस भरात 7 लाख 85 हजार 220 कोरोंना चाचण्या झाल्या असून चाचण्यांच्या तुलनेत बधितांच प्रमाण 1 पूर्णांक 89 दशांश इतक होत . काल एकंदर 13 हजार 1 शे 23 रुग्ण बरे झाले असून कोरोंना मुक्त झालेल्यांची आत्तापर्यंतची संख्या 1 कोटी 8 लाख 12 हजार 44 इतकी झाली तर रुग्ण बरे होण्याचा दर 97 पूर्णांक 6 शतांश टक्के झाली आहे . देशभरात सध्या उपचार घेणाऱ्यांची संख्या 1 लाख 70 हजार 126 असून एकंदर बधितांच्या तुलनेत हे प्रमाण 1 पूर्णांक 53 शतांश टक्के आहे उपचार सुरू असलेल्या रुग्णांच्या संख्येतील  वाढ एकट्या महाराष्ट्रात 1 हजार 4 शे 77 होती देशभरातल्या 20 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या रुग्ण संख्येत काल वाढ असली तरी 16 राज्यातली रुग्ण सख्या घटली आहे  काल कोविड 19 मुळे काल 98 जणांचा मृत्यू झाला असून आत्ता पर्यन्त मृतू पावलेल्यांची संख्या 1 लाख 57 हजार 346 झाली असून मृत्यू दर 1 पूर्णांक 41 शतांश टक्के आहे. काल देशभरात 7 लाख 68 हजार 7 शे 30 जणांना लस टोचली आत्तापर्यंत एकूण 1 कोटी 56 लाख 20 हजार 7 शे 30 जणांच  लसीकरण झालं आहे.

**युद्धसराव**

डेझर्ट फ्लॅग म्हणजे संयुक्त अरब अमिरातीच्या हवाई दलाद्वारे घेतला जाणाऱ्या वार्षिक बहु-राष्ट्रीय युद्धसराव कार्यक्रमात भारतीय हवाईदल प्रथमच संयुक्त अरब अमिराती, अमेरिका, फ्रान्स, सौदी अरेबिया, दक्षिण कोरिया आणि बहारीनच्या हवाई दलांसह सहभागी होत आहे.
संयुक्त अरब अमिराती च्या अल-धफ्रा हवाईतळावर येत्या 21 ते 27 मार्च या कालावधीत हा सहावा डेझर्ट फ्लॅग युद्धसराव होणार आहे.
सहा एसयू -30 एमकेआय, दोन सी -17 आणि एक आयएल -78 टँकर विमानासह भारतीय हवाईदल सहभागी होत आहे. नियंत्रित वातावरणात हवाई युद्धसराव करण्याच्या प्रशिक्षणासह

सहभागी सैन्याला प्रत्यक्ष अनुभव हे या सरावाचे उद्दीष्ट आहे. सहभागी सैन्यांना उत्कृष्ट कार्यपद्धतीची परस्पर देवाणघेवाण करण्यासह त्यांची कार्यक्षमता वाढविण्याची संधी मिळेल. गतिशील आणि वास्तववादी युद्धाच्या वातावरणात सहभागी राष्ट्रांसोबत सराव करणे आणि संवाद साधणे हे देखील आंतरराष्ट्रीय संबंध दृढ करण्यातील योगदान ठरेल.

**लडाख थंडी बचावकार्य**

हिवाळ्यात अत्यंत प्रतिकूल हवामान असताना लडाख येथील साडेतीन हजाराहून अधिक रहिवाश्यांना भारतीय हवाई दलाने सुरक्षित स्थळी हलवून कौतुकास्पद कामगिरी केली आहे. हवाई दलाचे यासाठी नेहमीच सहकार्य आणि सहानभूती मिळत असते अशा
शब्दात लडखचे मुख्य प्रांताधिकारी अहमद खान यांनी भारतीय हवाई दलाचे मानापासून आभार व्यक्त केले.

**टॉय फेअर**

इंडिया टॉय फेअरने आपले कारागीर, मध्यम लघु सूक्ष्म उद्योग, स्टार्टअप्स, तरुण डिझायनर्स आणि विचारवंतांसाठी संधीची एक खिडकी खुली केली आहे असं केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. इंडिया टॉय फेअरच्या समारोप समारंभात ते बोलत होते. आपल्या खेळण्यांमधून केवळ आपली समृद्ध संस्कृती आणि वारसाच दिसून येत नाही तर आपल्या मुलांची मने विकसित करण्याची प्रचंड क्षमता आहे. खेळण्यांमध्ये भारताला आत्मनिर्भर बनवणे एवढेच आमचे ध्येय नाही तर भारतात बनलेली आणि विकसित खेळणी म्हणून जगात ब्रँड इंडिया ही ओळख निर्माण करणे हे देखील आहे असं गोयल यावेळी म्हणाले.
लोकांच्या आग्रहामुळे डिजिटल टॉय फेअरचा कालावधी दोन दिवस वाढवला असून उद्या 4 मार्च पर्यंत सुरू राहणार आहे असं वस्त्रोद्योग सचिव यू.पी. सिंग यांनी सांगितलं. या टॉय फेअरनंतर देशी खेळण्यांना प्रोत्साहन देण्यासाठी 10-12 प्रादेशिक खेळण्यांचे मेळावे प्रत्यक्ष स्वरूपात आयोजित केले जातील, असंही त्यांनी सांगितलं.

**ट्रायफेडने जीआय महोत्सव**

आदिवासी कल्याण मंत्रालयाअंतर्गत आदिवासी सहकारी विपणन विकास महासंघ लिमिटेड ट्रायफेडनं लाल बहादूर राष्ट्रीय प्रशासन अकादमी आणि सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्यानं उद्या आणि परवा "जीआय महोत्सव" आयोजित केला आहे.
निवडक जीआय भौगोलिक मानांकन असलेल्या उत्पादनांचे 40 हून अधिक अधिकृत विक्रेते आणि आदिवासी कारागीर यात सहभागी होणार आहेत. मसुरीच्या लाल बहादूर शास्त्री प्रशासन अकादमीच्या प्रांगणात होणार्या या महोत्सवात प्रशिक्षणार्थी अधिकारी या उत्पादक आणि कारागीरांशी संवाद साधून वेगवेगळ्या प्रदेशात उत्पादन, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि विपणन योजना विकसित करण्यात मदत करतील.

## वन्यजीव दिन

आज जागतिक वन्यजीव दिन आहे. वने आणि उपजीविकाः शाश्वत लोक आणि पृथ्वी अशी या वर्षीच्या दिनाची संकल्पना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वन्यजीव संरक्षणासाठी काम करणाऱ्या सर्व पर्यावरण कार्यकर्त्यांची या दिनानिमित्त प्रशंसा केली आहे. भारतात सिंह, वाघ, बिबटया यांसारख्या विविध वन्यप्राण्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होताना दिसून येत आहे. आपल्या देशातील जंगलं आणि प्राण्यांचे अधिवास जपण्यासाठी आणि जोपासण्यासाठी आपण आवश्यक ते सर्व प्रयत्न केले पाहिजेत असं पंतप्रधान म्हणाले.
जागतिक वन्यजीव दिन हा वैविध्यपूर्ण वन्य-प्राणी जीवनाशी शाश्वत संबंध जोडण्याचा आणि संवर्धानाबाबतच्या प्रयत्नांना बळ देणारा दिवस आहे असं आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ट्वीट संदेशात म्हटलं आहे.

## खेलो इंडिया हिवाळी

जम्मू आणि काश्मीरमध्ये गुलमर्ग इथं काल संपलेल्या खेलो इंडिया हिवाळी स्पर्धांच्या दुसऱ्या टप्प्यात जम्मू काश्मीरनं पदक तालिकेत पहिला क्रमांक पटकावला आहे. जम्मू काश्मीरनं 11 सुवर्ण, 18 रौप्य आणि 5 कांस्य पदकं मिळवली. 27 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातून सुमारे बाराशे खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं; वारंवार आवाहन करुनही मास्क परिधान करण्याबाबत निष्काळजीपणा दिसून येत आहे. आपल्यासोबतच इतरांचीही काळजी घेणं आपल्याच हातात आहे. म्हणूनच मास्क वापरा, हात वारंवार स्वच्छ धुवा, सुरक्षित अंतर राखा आणि विश्वासार्ह बातम्यांसाठी ऐकत राहा, आकाशवाणी, नमस्कार.